(माधव आर्ट प्रिंटर्स, तासगांव)


# दि तासगांव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., तासगांव

प्रधान कार्यालय : तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली फोन नं. (०२३४६) २४१२९०, २४१२९१

शाखा ..................................................


## सेफ डिपॉझीट लॉकर्स करारनामा / Safe Deposit Locker Agreement

दि तासगांव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., तासगांव तर्फे शाखाधिकारी

For - THE TASGAON URBAN CO-OPERATIVE BANK LTD., TASGAON Branch Manager

श्री. ______________________________ } करारनामा लिहून

रा. (Address) ______________________ वय वर्षे (Age) } घेणार (बँक)

**आणि**

श्री. ______________________________ } करारनामा लिहून

रा. (Address) ______________________ वय वर्षे (Age) } देणार (ग्राहक)

व्यवसाय (Occupation) ______________________

''बँक'' या संज्ञेमध्ये त्याचे उत्तराधिकारी प्रशासक आणि अधिकृत प्रतिनिधी समाविष्ट असेल आणि ग्राहक या संज्ञेमध्ये खालील व्यक्ति/कायदेशीर व्यक्तिंचा समावेश असेल.

अ. एक किंवा अधिक व्यक्ति त्याचे/तिचे/त्यांचे वारस कार्यकारी, प्रशासक आणि कायदेशीर प्रतिनिधी

ब. प्रोप्रायटरशिप फर्म, मालक आणि त्याचे / तिचे वारस एक्झिक्युटर प्रशासक आणि कायदेशिर प्रतिनिधी

क. भागीदारी फर्म आणि तिचा उत्तराधिकारी अशा फर्मचे भागीदार त्यांच्यातील हयात व्यक्ति आणि वारस, कार्यवाह प्रशासक, कायेशिर प्रतिनिधी;

ड. हिंदू अविभाजित कुटुंब (HUF) त्याचे सदस्य आणि त्यांचे कायदेशीर वारस, कार्यकारी, प्रशासक आणि कायदेशीर प्रतिनिधी

इ. लिमिटेड कंपनी, तिचे उत्तराधिकारी

**ज्याअर्थी :**

अ. सुरक्षित ठेव लॉकर सुविधेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या ग्राहकाने अशा सुविधेसाठी बँकेकडे संपर्क साधला आहे.

ब. बँक काही अटी व शर्तीच्या अधीन राहून ग्राहकांना सुरक्षित ठेव लॉकर सुविधाप्रदान करण्यास सहमत आहे

क. करारनामा लिहून घेणार व लिहून देणार या संदर्भात त्यांच्यामध्ये आपआपसात हा करार करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार दोहोमधील करारनामा खालीलप्रमाणे

**१. लॉकर परवाना**

१.१ परवाना देणार म्हणून बँक याद्वारे ग्राहकाला परवानाधारक म्हणून सुरक्षित ठेव लॉकर वापरण्याचा परवाना या करारांतर्गत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार देत आहे.

१.२ ग्राहक या कराराद्वारे शेड्यूलमध्ये निर्दिष्ट केल्यानुसार भाडे अगर ठेव रक्कम देणेस मान्यता देत आहे.

१.३ ग्राहकास मान्य आहे की सदर लॉकर हे

अ वैयक्तिक आणि ग्राहकाच्या स्वत:च्या वापरासाठी आणि ग्राहकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या वापरासाठी नाही.

ब. अहस्तांतरणीय आहे

क. केवळ दागिने आणि दस्तऐवज यासारख्या मौल्यवान वस्तू साठवण्यासारख्या वैध हेतूंसाठी असून कोणतीही रोख किंवा चलन साठवण्यासाठी नाही.

ड. खालील बाबी साठवण्यासठी नाहीत

(i) शस्त्रे स्फोटके औषधे आणि कोणतीही प्रतिबंधित सामग्री

(ii) कोणतीही नाशवंत सामग्री आणि किरणोत्सर्गी सामग्री आणि किंवा कोणतेही अवैध पदार्थ

(iii) कोणतीही सामग्री जी बँकेला किंवा तिच्या कोणत्याही ग्राहकांना उपद्रव होण्याचा धोका निर्माण करु शकते.

१.४ या कराराअंतर्गत निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार लॉकर रुममध्ये प्रवेश करण्याच्या आणि लॉकर वापरण्याच्या अधिकाराशिवाय ग्राहकाला लॉकरबाबत इतर कोणताही अधिकार किंवा मालकी असणार नाही.

१.५ ग्राहकाला खालील अटीस अधिन राहून लॉकर वापण्याची परवानगी दिली जाईल

अ. बँकेच्या कामकाजाच्या दिवशी लॉकर ऑपरेशनसाठी बँकेने वेळोवेळीसूचित केलेल्या विशिष्ट वेळेत आणि अशी/सूचना नसताना बँकेच्या कामकाजाच्या वेळेत वापरता येईल, तथापि पूर, दंगल, कर्फ्यु!, लॉकडाऊन इ. अशा बँकेच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणामुळे लॉकर वापरण्याची परवानगी देण्याचे बँकेवर कोणतेही बंधन असणार नाही.

ब. ग्राहकाने बँकेच्या रजिस्टरमध्ये अशा व्यवहाराची तपशिलवार व बँकेने ठरविलेल्या पद्धतीने नोंद केलेनंतर आणि बँकेने मागणी केल्यास व त्यानुसार ग्राहकाने ओळखीचा पुरावा दिल्यास लॉकर वापरणेची परवानगी दिली जाईल.

ड. १) ग्राहकाच्या कोणत्याही कृत्यामुळे बँकेचे जे नुकसान होईल त्याचा बोजा लॉकरमध्ये असलेल्या जीनसावर असल्याचे कबूल आहे. आम्ही ग्राहकांच्या अधिकृत इसमांनी अगर वालीवारस वगैरेंनी बँकेचे ग्राहकाने डिपॉझिट व्हॉल्टबाबत येणे होईल ते न दिले तर सदरचे जिन्नस बँकेने नियमाप्रमाणे विकून वसूल करुन घ्यावे व कमी आल्यास ते पुरे करण्यास ग्राहक जातीने बांधून घेत आहोत. आमच्या पश्चात आमची ईस्टेट सदर घेण्यास जबाबदार आहे. २) हा करारनामा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबत बँकेचे सर्व नियम व या दोन्हीमुळे उत्पन्न होणारे आपणा उभयंताचे अंतर्गत परस्परसंबंध व आमच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्या व बंधन यास आम्ही जिम्मेदार आहोत व आमच्या पश्चात आमचे वेळोवेळी नेमुन दिलेले अधिकृत इसम, वालीवारस, एक्झिक्युटर, ॲडमिनिस्ट्रेटर वगैरे सर्व त्यास आमच्याप्रमाणे जिम्मेदार आहेत. ३) आम्हास वापरण्यासाठी दिले लॉकर मी किंवा माझ्या/आम्ही किंवा आमच्या अधिकृत प्रतिनिधी उघडल्यानंतर व्यवस्थित बंद केल्यामुळे आतील जिनसाचे काही नुकसान झाल्यास त्याबद्दल मी/आम्ही बँकेस जबाबदार धरणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी आमची राहील. ४) सेफ डिपॉझिट लॉकर्स अथवा सेफ कस्टडीमध्ये जिन्नस ठेवल्यावर बँक लॉकर्स भाड्याने घेणारा अथवा जिन्नस सेफ कस्टडी मध्ये ठेवणारा यामध्ये सदर जिन्नसाबाबत निक्षेपगृहीता आणि निक्षेपदाता असे संबंध राहतील. असे जिन्नस केव्हाही परत नेण्याबद्दल निक्षेपगृहीत या नात्याने निक्षेपदाता यास लेखी सूचना देण्यास बँकेस अधिकार राहील. तथापि त्याप्रमाणे जिन्नस परत नेल्यास त्या जिन्नसाबाबतची बँकेची सर्व जबाबदारी संपुष्टात येईल. ५) बँकेचे दप्तरी असलेल्या भाडेकरुचे/निक्षेपदात्याचे सरते शेवटचे पत्त्यावर अशी लेखी सूचना दिल्यावर अथवा लॉकर भाडे थकल्यावर किंवा भाड्याने देण्याचा विशिष्ट मुदतीसाठी केलेल्या कराराची मुदत संपल्यावर त्यांनी आवश्यक ती पूर्तता न केल्यास बँकेची ताब्यात असलेले भाडेकरुचे/निक्षेपदात्याचे जिन्नस त्यास पूर्वसूचना देऊन त्याचा सार्वजनिक लिलावाने अन्य मार्गाने विक्री करण्याचा बँकेस अधिकार राहील. विक्री करुन आलेल्या रकमेवर बँकेचा प्रथम हक्क राहील व बँक खात्यामधून आपले चार्जेस वसूल करुन घेऊन उर्वरित रक्कम अदा करेल.

२.१ सदर करारनाम्याचे पोटी आज रोजी आम्ही आपणास भाडे रुपये आगाऊ द्यावयाचे ते दिले आहेत.

२.२ करारनाम्याची मुदत आजपासून महिने/वर्ष आहे. या मुदतीत आम्ही बँकेची लॉकर मोकळी करुन देऊ. मुदतीपुढे लॉकर वापरण्याकरिता आमचेकडे ठेवण्याची असल्यास व आपण ठेवू दिल्यास या करारनाम्याची मूळ मुदत संपण्यापूर्वी त्यावेळी प्रचलित असलेल्या बँकेच्या नियमाप्रमाणे आगाऊ भाडे देऊ या प्रमाणे आम्ही न वागल्यास नियमाप्रमाणे आमच्यावर पडणाऱ्या जबाबदारीस आम्ही पात्र असून लॉकरचे वार्षिक भाडे माझे/आमचे सेव्हिंग खाते नंबर मधून टाकून जमा करण्यात यावे किंवा बँकेकडील कोणत्याही ठेवीतून अथवा त्याचे व्याजातून जमा करुन घ्यावी त्यास मी आम्ही हरकत घेणार नाही व होणारे नुकसानीस मी/आम्ही जबाबदार राहू.

२.३ भाडे कराराची मुदत संपण्यापूर्वी अगर उभय पक्षांनी वाढविलेली मुदत संपण्यापूर्वी आम्ही मयत झाल्यास आमचे अधिकार ज्या कोणास द्यायचे ते अधिकारपत्र आम्ही निराळे देऊन आपल्याकडे ठेवले आहे. जरुर लागल्यास ते पुढे बदलून घेण्याची आम्ही व्यवस्था करु.

२.४ आम्हास वापरण्यास दिलेली लॉकर आम्ही मुदतीत अगर उभयपक्षी वाढीव मुदतीत मोकळी करुन न दिल्यास सेफ डिपॉझिट व्होल्टमधील लॉकर भाड्याने देण्याबाबत नियमान्वये तजवीज करुन आपण आमच्या खर्चाने व जबाबदारीवर लॉकर मोकळी करुन घ्यावी.

**३. ग्राहकाचे हमी आणि दायित्वे**

अ) ग्राहकाने लॉकरचा वापर प्रचलित कायदा आणि बँकेच्या नियमांनुसार व ज्या उद्देशासाठी लॉकर सेवा घेतली आहे त्याच उद्देशासाठी करावा

ब) ग्राहकाने लॉकर ऑपरेशनसाठी बँक वेळोवेळी ठरवेल त्या नियम व अटींचे पालन करावे

क) ग्राहकाने लॉकरचा अनधिकृत वापर टाळणेसाठी लॉकर उघडण्यासाठी बँकेने प्रदान केलेली किल्ली, पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळक यंत्रणा सुरक्षित ठिकाणी ठेवावी, ती इतर कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करु नये अथवा कोणत्याही व्यक्तीच्या हातात पडू देऊ नये.

ड) ग्राहकाने लॉकरचा वापर बँकेने दिलेली चावी. पासवर्ड किंवा बँकेने प्रदान केलेली इतर कोणतीही ओळख यंत्रणा वापरुनच करावा अन्यथा करु नये.

इ) ग्राहकाने लॉकरच्या वापरासाठी बँकेने प्रदान केलेल्या किल्लीची किंवा इतर कोणत्याही ओळख प्रणालीची प्रत (कॉपी) तयार करु नये अथवा त्यामध्ये मोडतोड वा बदल करु नये.

फ) ग्राहकाने लॉकर वापरासाठी बँकेने प्रदान कलेली चावी, पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा हरवल्यास बँकेला त्वरीत

कळवावे.

ग) ग्राहकाने लॉकरच्या वापरासाठी बँकेने प्रदान कलेली किल्ली, पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा हरवल्याची यापूर्वी बँकेला तक्रार केली असलेस सदर यंत्रणा सापडल्यास बँकेकडे तात्काळ परत द्यावी.

ह) लॉकरच्या अंगच्या दोन कुलपाच्या प्रत्येकी एक अशा दोन किल्ल्या आहेत. त्यापैकी एक किल्ली मास्टर किल्ली आपल्याजवळ असून दुसरी आपण आम्हास दिली ती आम्ही जतन करुन व हरवल्यास आपणास ताबडतोब कळवु. किल्ली आमच्याकडून हरवल्याने किंवा आमच्या दुसऱ्या कोणत्याही कृत्याने बँकेच्या इमारतीचे लॉकरचे वगैरे अगर दुसऱ्या कोणाचे नुकसान झाल्यास ते आम्ही बिनतक्रार भरुन देऊ.

ई) ग्राहकाने बँकेला भाडे जेव्हा देय असेल तेव्हा द्यावे आणि बँकेने खालील बाबींवर खर्च केला असलेस तो सहन करावा.
१) बँकेने प्रदान केलेली चावी हरवल्याचा ग्राहकाच्या अहवालानंतर सदर लॉकरचे कुलुप बदलणे आणि लॉकरची दुरुस्ती करणे
२) सदर करारातील अटीचे उल्लंघन झालेस लॉकर फोडणे

य) ग्राहकाचा पत्ता फोन नंबर, ईमेल आयडी, मोबाईल नंबर इत्यादी संपर्क तपशीलामध्ये बदल झालेस नवीन माहिती बँकेला त्वरित कळवा.

**३. बँकेचे अधिकार**

**३.१ बँकेला खालील गोष्टीचा अधिकार असेल**

अ) लॉकरच्या वापरासाठी बँकेने ठरवून दिलेले भाडे ग्राहकाने न भरलेस सदर देय भाडे तसेच बँकेचा लॉकरपोटी झालेला इतर कोणताही खर्च ग्राहकांच्या खात्यातुन वसूल करणे.

ब) खालील परिस्थितीमध्ये ग्राहकास लॉकरचा वापर करु न देणे
१) लॉकरचे देय भाडे अदा न केलेस
२) लॉकरमध्ये प्रवेश देणेसाठी बँकेने मागणी केलेला ओळखीचा पुरावा देणेस ग्राहक अयशस्वी ठरलेस

३.२ लॉकर रद्द करणे

३.२.१ ग्राहकांनी या करारपत्रातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास किंवा चुक केल्यास किंवा बँकेस असे वाटले की ग्राहक कराराच्या अटी व शर्तीचे पालन करत नाही अथवा सहकार्य करत नाही अशा परिस्थितीमध्ये बँक ग्राहकास रजिस्टर पोस्ट किंवा स्पीड पोस्ट द्वारे (आणि ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असलेस १) ई–मेल द्वारे आणि २) जेथे ग्राहकाचा मोबाईल नंबर उपलब्ध आहे तिथे ड्वड द्वारे किंवा व्हॉटसॲपद्वारे) ग्राहकाला किमान तीन महिन्यांआधी लेखी नोटीस (टर्मिनेशन नोटीस) जारी करुन सदर लॉकर वापराचा परवाना रद्द करु शकते.

३.२.२ लेखी नोटीस (टर्मिनेशन नोटीस) मिळाल्यानंतर ग्राहकास ताबोडतोब आणि टर्मिनेशन नोटीस अंतर्गत निर्धारित नोटीस कालावधी संपण्यापूर्वी लॉकर रिकामा करावा लागेल आणि बँकेने प्रदान केलेल्या चाव्या, पासवर्ड किंवा इतर कोणतीही ओळख यंत्रणा आणि कागदपत्रे बँकेस परत करावी लागतील.

**३.३ लॉकर तोडणे आणि त्यातील सामग्री हाताळणे**

३.३.१ बँकेला करारातील तरतुदी, बँकेच्या अंतर्गत धोरणे कार्यपद्धती आणि प्रचलित लागु कायदे आणि नियमास अधिन राहून खालीलपैकी कोणतीही एक किंवा अधिक घटनेनंतर लॉकर तोडणेचा अधिकार राहील.

अ) अट नं. ३.२.१ नूसार ग्राहकाला नोटीस दिलेनंतर नोटीस कालावधीच्या समाप्तीपूर्वी ग्राहक सदर लॉकर बँकेस रिकामा करुन देत नसलेस

ब) सलग ३ (तीन) वर्षे भाडे अदा केले नसलेस

क) ७ (सात) वर्षे किंवा त्याहुन अधिक कालावधीसाठी लॉकरचा वापर केला नसलेस (भाडे दिले असले किंवा नसेल तरी) किंवा ग्राहकाशी बँकेचा संपर्क होत नसलेस

३.३.२ लॉकर उघडणेचा/तोडणेचा अधिकार वापरण्यापूर्वी बँकेस ग्राहकाला किमान तीन महिने आधी लेखी नोटीस (वरील ३.२.१ अंतर्गत समाप्तीच्या सूचनेव्यतिरिक्त( रजिस्टर पोस्टाने आणि ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असलेल्या १) ई मेलद्वारे २) ग्राहकाचा मोबाईल फोन नंबर उपलब्ध आहे तिथे SMS द्वारे वा व्हॉटसॲपद्वारे) द्यावी लागेल. (ब्रेक ओपन नोटीस)

३.३.३ या करारांतर्गत कोणत्याही अटीचे उल्लंघन झाले असले तरी लॉकर तोडण्यापूर्वी बँक ग्राहकाच्या मोबाईल फोनवर संदेश पाठवुन ग्राहकाच्या पत्यावर वैयक्तिक संदेशवाहक पाठवून ग्राहकांच्या लँड लाईन, मोबाईल फोनवर फोन कॉल करुन ग्राहकाशी संपर्क साधण्यासाठी सर्व शक्य प्रयत्न करेल

३.३.४ बँकेने पाठवलेल्या लॉकर रद्द करणेची नोटीस (Termination Notic) आणि लॉकर तोडणेची (Locker Break Open Notic) नोटीस वितरित न झाल्यास किंवा बँकेने अट नं. ३.३.२ आणि ३.३.३ अंतर्गत नमूद केलेल्या गोष्टींसह वाजवी प्रयत्न करुनही ग्राहकाशी संपर्क न झालेस बँकेने लॉकर तोडण्याआधी याबाबत कमीत कमी ३ महिनेआधी ग्राहक ज्या ठिकाणी राहतो त्या अथवा ग्राहकाने तदनंतर कळविलेल्या पत्याच्या ठिकाणी किमान २ वृत्तपत्रात (एक इंग्रजीत आणि दुसरी मराठीमध्ये) जाहीर नोटीस द्यावी.

३.३.५ लॉकर फोडण्याचे काम बँकेचे दोन अधिकारी आणि साक्षीदार म्हणून काम करणाऱ्या दोन स्वतंत्र व्यक्ती अशा समितीच्या उपस्थितीत

केले जावे.

३.३.६ वर नमुद केलेल्या प्रक्रियेचे पालन करुन लॉकर उघडल्यानंतर बँक लॉकरमधील सामग्रीची तपशीलवार यादी तयार करेल आणि बँकेच्या अधिकृत मुल्यांकन करणाऱ्या व्यक्तिद्वारे लॉकरमधील सामुग्रीचे मूल्यांकन करेल आणि लॉकरची सामग्री छेडछाड प्रतिबंधित असणाऱ्या अग्निरोधक तिजोरीत तपशीलवार यादीसह सीलबंद लिफाफ्यात ठेवेल.

३.३.७ वरील व्यतिरिक्त बँक इन्व्हेंटरी असेसमेंटसह ब्रेक ओपन प्रक्रियेचा व्हिडिओ देखील रेकॉर्ड करेल आणि भविष्यात कोणत्याही विवादाच्या किंवा न्यायालयीन खटल्याच्या बाबतीत पुरावे प्रदान करण्यासाठी ते सुरक्षित ठेवेल आणि जतन करेल.

३.३.८ याशिवाय लॉकर उघडण्याचे तपशील लॉकर रजिस्टर तसेच बँकेच्या कोअर बँकिंग सिस्टीममध्ये (CBS) अथवा इतर सायबर सिक्युरिटी धोरणाचे पालन करणाऱ्या संगणक प्रणालीमद्ये नोंद वा जतन करेल.

३.३.९ वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे तयात केलेल्या यादीमध्ये नोंदवलेल्या लॉकरच्या वस्तूंची विल्हेवाट, सार्वजनिक लिलावात विक्रीद्वारे केली जाईल आणि विक्रीच्या रक्कमेमधून प्रथम ग्राहकाकडून बँकस देय अरणारी रक्कम (थकबाकी भाडे. लॉकर तोडणेचा खर्च आणि इतर कोणत्याही देय रकमेसह) वसूल करुन शिल्लक रक्कम ग्राहकाला परत केली जाईल किंवा ग्राहकाच्या आदेशानुसार विल्हेवाटीसाठी ठेवली जाईल.

३.३.१० सार्वजनिक लिलाव करुन लॉकरमधील सामग्रीची विक्री करण्यापूर्वी बँकेस ग्राहकाला किमान तीन महिने आधी रजिस्टर पोस्टाने लेखी नोटीस पाठवावी लागेल तसेच ग्राहकाचा ईमेल आयडी उपलब्ध असल्यास ई मेलद्वारे आणि जेथे ग्राहकाचा मोबाईल फोन नंबर उपलब्ध आहे तिथे SMS द्वारे किंवा व्हॉटसअॅपद्वारे द्यावी लागे. (लिलाव सूचना) या नोटीशीमध्ये लिलावाची तारीख, वेळ, ठिकाण आणि लॉकरच्या सामग्रीच्या यादी असणे आवश्यक राहील.

**४. बँकेची जबाबदारी आणि दायित्वातून मुक्तता**

४.१ पाऊस, आग, पूर, भूकंप, दिवाबत्ती, नागरी अशांतता किंवा गोंधळ, दंगल किंवा युद्ध किंवा कोणत्याही दहशतवादी हल्ला किंवा इतर कोणत्याही तत्सम कारणाने लॉकरमधील सामग्री खराब झाल्यास किंवा नुकसान झाल्यास बँक कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

४.२ ग्राहकाच्या चुकीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे लॉकरच्या सामग्रीचे कोणतेही नुकसान/हानी झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही.

४.३ करारांतर्गत कोणत्याही अटीचे उल्लंघन झालेमुळे बँकेने लॉकर तोडल्यास आणि त्यातील सामग्रीची प्रचलित नियम व कायद्यानुसार विल्हेवाट लावल्यास ग्राहकाने केलेल्या कोणत्याही खर्चासाठी, तोट्यासाठी किंवा उत्तरदायित्वासाठी (कोणतेही नुकसान किंवा लॉकरच्या सामग्रीच्या नुकसानासह) बँक जबाबदार राहणार नाही.

४.४ लॉकरमधील सामुग्रीचा बँकेकडून कोणत्याही प्रकारे विमा उतरविला जाणार नाही व कोणत्याही जोखमीच्या विरोधात लॉकरमधील सामग्रीचा विमा उतरवण्याचे कोणतेही दायित्व बँकेवर असणार नाही.

**५. बँकेचे लॉकर धारण**

बँकेच्या लॉकर्स धोरणामधील सर्व नियम व अटी ग्राहकास बँकेने समजावून सांगील्या असून त्या दोहोंवर बंधनकारक राहतील.

**६. कायदा आणि अधिकार क्षेत्र**

हा करार भारतीय कायद्याच्या अधीन आहे आणि त्यातील सर्व बाबी बँक ज्या ठिकाणी आहे किंवा बँकेच्या कार्यक्षेत्रात आहे त्या न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील

७. कारणपरत्वे आम्हाला स्वत: येऊन लॉकर उघडणे शक्य न झाले तर अशावेळी लॉकर उघडण्याचा अधिकार आमच्यातर्फे ज्या कोणा इसमास दिला/द्यावयाचा असेल त्याचे नांव व त्याची सहीचा नमुना मी स्वत: बँकेत दाखल करत आहोत/करु. एकदा दिलेला मुख्त्यार काढून टाकावयाचा झाल्यास किंवा दुसरा मुख्त्यार नेमावयाचा झाल्यास तशी लेखी नोटीस आम्ही बँकेस आगाऊ दिली पाहीजे. तत्पूर्वी बँकेच्या दप्तरी दाखल असलेल्या मुख्त्याराने जे व्यवहार आमच्याकरता केले असतील त्याची जबाबदारी आमच्यावर आहे. बँकेवर नाही. एक मुख्त्यावर कमी करुन दुसरा मुख्त्यार नेमतेवेळी जरुर वाटल्यास आम्ही आपला खूणेचा शब्द बदलून घेऊ व तसा तो बँकेने आम्हास बदलून द्यावा. आम्ही दिलेल्या मुखत्याराच्या कोणत्याही कृत्याची जबाबदारी बँकेचा भाडेकरी या नात्याने सर्वस्वी आमच्यावर आहे त्याच्याकडून बँकेचे जे नुकसान होईल ते आम्ही बँकेस भरुन देऊ.